ePaper

## 'काळ मोठा कठीण आलाय, पण ही वेळही निघून जाईल' - उद्धव ठाकरे



| वर्ष - 6 | अंक - 89 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार| दिनांक 4 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- इंदापूरमध्ये अवतरले पंढरपूर
- इडी, सीबीआयचा राजकीय वापर बंद करा !
- आरे कारशेडसाठी नव्याने वृक्ष कत्तलींची गरज नाही



आघाडी सरकारच्या काळात अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी विधानसभा अध्यक्ष निवडणुकीला मान्यता देण्यासाठी मंत्र्यांचे शिष्टमंडळ तीन वेळा राज्यपालांना भेटले होते, तरीही त्यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारण देत निवडणुकीला परवानगी दिली नाही. आता भाजपपुरस्कृत सरकार येताच, त्यांनी अध्यक्षपदाची निवडणूक घेण्यास परवानगी दिली. राज्यपालांमधील रामशास्त्री प्रभुणे झोपले होते, आता सत्ताबदल झाल्यावर जागे झाले आहेत.

**- बाळासाहेब थोरात,** काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते

कुणी काहीही म्हटलं तरी सगळ्यांच्या मनात धाकधूक धाकधूक आहे. भाजपाचे १०५ आमदारांनी आपल्या सदसदविवेक बुद्धीला स्मरून विचारा की जे घडलंय त्याने आपलं समाधान झालं आहे का? चंद्रकांत पाटील यांनी यावर बाकडं वाजवू नये. तुमचं मंत्रीपदच येईल की नाही सांगता येत नाही. कुठं बाकडं वाजवताय? शिवसेनेतून तिकडे गेलेल्या ३९ लोकांपैकी किती लोकांना मंत्रिपद मिळणार आहे? सगळ्यांना वाटतंय मिळेन. काय होईल काही सांगता येत नाही.

**- अजित पवार,** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



### जिंकून देणारे सहकारी शिंदे-फडणवीस निवडणार

# आ. महेश लांडगे यांना मंत्रीपदाची लॉटरी ?

### महापालिकेत भाजपाचीच सत्ता कायम ठेवण्यासाठी भाजपची रणनिती

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज |**

अजित पवार यांनी पुन्हा सर्व ताकद पणाला लावून पिंपरी चिंचवड महापालिका ताब्यात घेण्याचा निश्चय कल्याने आता या महापालिकेत भाजपाचीच सत्ता कायम ठेवण्यासाठी भोसरीकर आमदार महेश लांडगे यांनी मंत्रीपदाची लॉटरी लागू शकते. पुणे शहरातून चंद्रकांत पाटील व माधुरी मिसाळ तर जिल्ह्यातून राहुल कूल यांची नावे चर्चेत आहेत.ठाकरे सरकारमध्ये एकूण ३३ कॅबिनेट मंत्री आणि दहा राज्यमंत्री होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच मंत्रीमंडळाची व्यूहरचना करतील. शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी दोन हात करून विजय मिळवून देणारे सहकारी ते निवडतील यात कोणतीही शंका नाही. कारण कारभारासाठी हाती दोन वर्षांचाच कालावधी असणार आहे, त्यातही निवडणुकांचा हंगाम पाहता मोठ्या जोमाने या जोडीला काम करावे लागणार आहे.

**संभाव्य मंत्री म्हणून चर्चेतील नावे** - नव्या मंत्रिमंडळामध्ये विद्यमान मंत्री उदय सामंत, गुलाबराव पाटील, अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, दादा भुसे, शंभूराज देसाई, बच्चू कडू, राजेंद्र



पाटील-यड्रावकर यांच्यासोबत नव्याने दीपक केसरकर, संजय शिरसाट, भरत गोगावले, तानाजी सावंत, संजय राठोड, शहाजी पाटील यांची शिंदे गटाकडून वर्णी लागेल, अशी सध्याची परिस्थिती आहे. भाजपमध्ये मात्र उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे गृहमंत्रीपद जाण्याची दाट शक्यता आहे. कारण मागील काळात त्यांनी हे पद स्वतःकडेच ठेवले होते. सत्ताप्राप्तीसाठी त्याचा कसा उपयोग करून घ्यायचा, याचा राजकीय वस्तुपाठ त्यांनी घालून दिला होता. याशिवाय सुधीर मुनगंटीवार, आशिष शेलार, गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, विजयकुमार देशमुख किंवा सुभाष देशमुख, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, संभाजी पाटील-निलंगेकर, राणा जगजितसिंह पाटील, संजय कुटे, विजयकुमार गावित, सुरेश खाडे, जयकुमार रावल, अतुल सावे, देवयानी फरांदे, जयकुमार

#### शिरुर लोकसभा उमेदवार म्हणूनही आ. लांडगेंकडे पाहिले जाते...

आमदार महेश लांडगे हे भाजपाचे शहराध्यक्ष आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रत्येक मोहिमेत सहभाग असतो. आमदार लांडगे यांनी आयोजित केलेल्या बैलगाडा स्पर्धेसाठी फडणवीस अवर्जून उपस्थित होते, त्याचवेळी आगामी काळात भाजपाचे सरकार आल्यावर लांडगे मंत्री होतील अशी शक्यता बळावली होती. शिवसेना बंडखोरांची गोव्यातील बडदास्त ठेवण्याची तसेच त्यापूर्वी गोवा विधानसभा मतदारसंघ निवढणुकितही आमदार लांडगे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. फडणवीस आणि चंद्रकांत पाटील यांच्या मर्जीतील आमदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्यावेळी २०१७ मध्ये आमदार लक्ष्मण जगातप यांनी सर्व युक्त्या वापरुन अजित पवार यांच्या ताब्यातील महापालिका भाजपाला मिळवून दिली. आमदार जगताप यांचे प्रकृती स्वास्थ ठिक नसल्याने आता तिच जबाबदारी आमदार लांडगे यांच्याकड असणार आहे.

# शिरुर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील शिवसेनेतच...

### खासदार विनायक राऊत यांचा खुलासा, मध्यवर्ती कार्यालियातून प्रसिद्ध पत्रक

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज|**

शिवसेनेचे उपनेते आणि शिरुर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्याची बातमी शिवसेनेचे मुखपत्र सामनातून प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, सामना दैनिकात आलेली बातमी ही अनावधानाने छापण्यात आली आहे. शिवाजीराव आढळराव पाटील हे शिवसेनेतच आहेत. ते शिवसेना उपनेता म्हणून कार्यरत असल्याचा खुलासा शिवसेनेचे सचिव




मला फेसबुकवरील शुभेच्छांबद्दल उद्धव ठाकरेंनी विचारलं. नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांना मी फक्त शुभेच्छा दिल्याचं स्पष्टीकरणही त्यांना दिलं. शिवाय मंगळवार अथवा बुधवारी मुंबईत भेटायचंही आमचं ठरलं. मग काही तासातच माझी पक्षातून हकालपट्टी कशी काय होऊ शकते? बहुदा असं पत्रक शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीला देण्यात आलं आहे. याची कल्पना स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना नसावी, असंही आढळराव पाटील यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले होते.

**- माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील**

आणि खासदार विनायक राऊत यांनी केला आहे. ही माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना फेसबुकवरुन आढळराव पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. 'गर्जत राहील आवाज हिंदुत्वाचा' अभिनंदन मुख्यमंत्री साहेब. असा आशयासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतचा फोटोही आढळरावांनी टाकला आहे. या शुभेच्छा दिल्यानेच पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी त्यांची थेट शिवसेनेतून हकालपट्टी करण्याचं पाऊल उचलल्याचं बोललं जात होतं. शिवाजीराव आढळराव पाटील यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आल्याची बातमी सामना या मुखपत्रातून प्रसिद्ध करण्यात आली होती. आढळराव पाटील यांची फेसबुक पोस्ट ही पक्षविरोधी असल्याचा ठपका ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आल्याचे सकाळीच वृत्त समजताच आढळरवांना देखील धक्का बसला होता. मात्र, ते शिवसेनेतच असल्याचे विनायक राऊत यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या वृत्तानंतर शिवाजीराव आढळराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली होती. काल रात्रीच उद्धव ठाकरेंशी आढळराव पाटील यांचे फोनवरुन बोलणं झालं होतं. त्यावरुन सकाळी पक्षातून हकालपट्टी होईल अशी पुसटशी कल्पनाही नव्हती, अशी पहिली प्रतिक्रिया आढळराव पाटील यांनी दिली होती. शनिवारी रात्री फोनवरुन झालेल्या संभाषणात, जिल्ह्यातील काही पदाधिकारी आपणास रविवारी भेटायला येणार आहेत, याची कल्पना मी उद्धव ठाकरेंना दिली.

## शॉर्ट न्यूज »

### धायरीतील शेततळ्यात शाळकरी मुले बुडाली



। पुणे। महाईन्यूज ।

शेततळ्यात पोहण्यासाठी उतरलेल्या दोन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सिंहगड रस्ता परिसरातील धायरीत रविवारी घडली. सूरज शरद सातपुते (वय १४), पुष्कर गणेश दातखिंडे (वय १३, दोघे रा. नालंदा हायस्कूलशेजारी, धायरी) अशी मृत्युमुखी पडलेल्या मुलांची नावे आहेत. धायरीतील रायकर मळा भागात खंडोबा मंदिराजवळ शेततळे आहे. रविवारी सकाळी दहाच्या सुमारास सूरज, पुष्कर आणि त्यांचा मित्र अथर्व चव्हाण खंडोबा मंदिरात दर्शनासाठी गेले होते. तेथून काही अंतरावर शेत आहे. सीमाभिंतीवरुन उडी मारुन सूरज, पुष्कर आणि अथर्व शेतात गेले. त्यानंतर शेततळ्यात सूरज आणि पुष्कर पोहण्यासाठी उतरले. अथर्व काठावरच थांबला होता. शेततळ्यात आठ ते नऊ फूट पाणी आहे. शेततळ्याच्या तळाला चिकट माती होती तसेच उतार असल्याने पाण्यात पोहण्यासाठी उतरलेले सूरज आणि पुष्कर यांना शेततळ्यातून बाहेर पडता आले नाही.

# इंदापूरमध्ये अवतरले पंढरपूर!

## भाविकांच्या गर्दीने सर्व रस्ते गेले फुलून

इंदापूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

संतशिरोमणी तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा विसावा असल्याने इंदापूरमध्ये रविवारी पंढरपूर अवतरले होते. भाविकांच्या गर्दीने सर्व रस्ते फुलून गेले होते. पालखीचे दर्शन घेण्यासाठी रात्री उशिरापर्यंत रांगा लागल्या होत्या.

पालखीचा मुक्काम सलग दोन दिवस इंदापूर शहरात असल्याने इंदापूरकरांना वैष्णवांची, पालखी रथाच्या बैलांची आणि अश्वांची सेवा करण्याची संधी मिळाली. शहरातील प्रशासकीय इमारतीच्या भव्य प्रांगणात मोठमोठे पाळणे आणि मिठाईवाल्यांनी आपली दुकाने थाटली होती. श्री नारायणदास रामदास हायस्कूलमध्ये संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी इंदापूर शहरासह आसपासच्या गावखेड्यातील नागरिकांनी गर्दी केली होती. चौकाचौकात भव्य स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. अन्नदान, अल्पोपार, औषधोपचार, चरण सेवा, चहा, बिस्कीट वाटप करून इंदापूरकर वैष्णवांची सेवा करताना दिसत होते.



दोन वर्षांच्या खंडानंतर पालखी सोहळा इंदापुरात दोन दिवसांच्या मुक्कामाला आल्याने इंदापूरकराच्या आनंदाला पारावर उरला नाही.

पालखीचा मुक्काम सलग दोन दिवस इंदापूर शहरात असल्याने इंदापूरकरांना वैष्णवांची, पालखी रथाच्या बैलांची आणि अश्वांची सेवा करण्याची संधी मिळाली. शहरातील प्रशासकीय इमारतीच्या भव्य प्रांगणात मोठमोठे पाळणे आणि मिठाईवाल्यांनी आपली दुकाने थाटली होती. श्री नारायणदास रामदास हायस्कूलमध्ये संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी इंदापूर शहरासह आसपासच्या गावखेड्यातील नागरिकांनी गर्दी केली होती.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूरचे प्रभारी पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पालखी सोहळ्यासमवेत असलेले सोहळा प्रमुख आणि विश्वस्तांच्या भोजनाची सेवा गेली ६० वर्षे गोकुळदास शहा, मुकुंद शहा आणि भरत शहा यांचे कुटुंब अव्याहतपणे करीत आहे.

---

# कैवल्य वारी या भक्तिगीतांच्या अल्बमचे प्रकाशन

## पंढरपूरपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यातील अर्थ, भावना, स्वरांमध्ये अंतरमनाला भिडणारे सामर्थ्य आहे, माजी आमदार उल्हास पवार यांचे उद्गार

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



आषाढी वारी निमित्त श्रिया क्रिएशन निर्मित कैवल्य वारी या भक्तिगीतांचा अल्बम नुकताच प्रकाशित करण्यात आला. आषाढी वारी सोहळ्यातील महत्वाच्या टप्प्यांचे वर्णन करणारी भक्तिगीते या कैवल्य वारीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. संगीत क्षेत्रातील नामवंत गायकांच्या आवाजात यातील सर्व १० गाणी स्वरबद्ध करण्यात आली आहेत.

कैवल्य वारी या अल्बममधील गाणी प्रासंगिक आणि रसाळ आहेत. यातील संतांच्या पालखीच्या प्रस्थानापासून पंढरपूरपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यातील अर्थ, भावना, स्वरांमध्ये अंतरमनाला भिडणारे सामर्थ्य आहे, असे उद्गार माजी आमदार उल्हास पवार यांनी काढले. संतांच्या पालखी प्रस्थानापासून पंढरपूरच्या पांडुरंगापर्यंत वारी मार्गावर प्रत्येक टप्प्याला महत्व आणि मुक्कामाला अर्थ आहे. या गाण्यातील सुंदर स्वरातून ते अभिप्रेत होते. तुकोबांच्या अभंगात सर्व विषय सामावलेले आहेत. त्यात संगीत, गायनाचा समावेश आहे. अशा संतांच्या पालखी सोहळ्यातील वातावरण, प्रसंग या अल्बमच्या माध्यमातून सर्वांसमोर येत आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

आषाढी वारीनिमित्त श्रिया क्रिएशन निर्मित वर्षा राजेंद्र हुंजे लिखित कैवल्य वारी हा दहा गाण्यांच्या अल्बमचे प्रकाशन नुकतेच पुण्यात करण्यात आले. त्या कार्यक्रमात पवार बोलत होते. पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, धवल आपटे, पं. शौनक अभिषेकी, पं. आनंद भाटे, संगीत संयोजक कमलेश भडकमकर, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी उपस्थित होते.

पंढरूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले की, विठ्ठल नादब्रम्ह आहे. या नादातून भक्तच विठ्ठलाकडे एकरुप होऊ शकतात. या अल्बममधील काव्यात जीव ओतून गायन व संगीतकाराने जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. अल्बमधील शब्द गायनाने अंतर्मुख केले आहे. काव्यात गोडवा असून, सुंदर आहे. महेश सूर्यवंशी म्हणाले, पालखी सोहळ्यात नसतानाही या गाण्यातून पालखीसोबत पंढरपूरला जात असल्याची अनुभूती मिळते. या वारीत सर्व प्रवास आपण या गाण्यातून अनुभवता येत असून, हे भाग्य म्हणावे लागेल. वारीला निघताना घर-दार, मुलं-बाळं, सोनं-नाणं या सगळ्या ऐहिक सुखात रममाण झालेल्या मनाची घालमेल सुरु असते. गृहिणींना तर वारीला निघणे अवघडच वाटत असते. पण एकदा का वारी अनुभवली की पुढच्या वर्षी मनाला आपोआप वारीचे वेध लागतात. ही गोडीच तशी असते. कैवल्य वारीचं पहिलं गाणं वारकऱ्यांच्या मनाच्या याच अवस्थेला धरुन आहे.

**सरता आनंदाची वारी**
**वाटे, नको पुन्हा घरी**

अशा शब्दात गायिका शमिका भिडेच्या आवाजात हे गाणे आपल्याला वारीत चालायला घेऊन जाते. आळंदीतून माऊलींच्या प्रस्थानाचं वर्णन करणारं दुसरं गाणं आहे पं शौनक अभिषेकींच्या आवाजात...

**थरथरला कळस**
**सळसळला पिंपळ**
**विठूभेटीला निघाले**
**माझे कैवल्य सोज्वळ**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी निघाल्यानंतर दुसऱ्या दिवशी देहूतल्या अनगडशहा बाबांच्या दर्ग्यावर थांबते, तिथे त्यांची आरती होते.

## शॉर्ट न्यूज

### वृद्ध महिलेचे 1.48 लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

दोन अनोळखी इसमांनी पिंपरीमध्ये (PIMPRI) पादचारी वृद्ध महिलेचे 1.48 लाख रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेले. जैनाफ आत्तार (वय 70 वर्षे, पिंपरी) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी या 2 जुलै रोजी दुपारी लाल बहादुर शास्त्री बँक पिंपरीच्या समोर पिंपरी ब्रिजवर एकट्याच मेडिकलमधून गोळ्या आणण्यासाठी जात असताना दोन अनोळखी इसम यांनी पाठीमागून (PIMPRI) पायी चालत येऊन फिर्यादीस पाठीमागून धक्का मारून खाली पाडले. त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने व कमरेस असलेली पैशांची पिशवी असा एकूण 1.48 लाख रुपये किंमतीचा माल बळजबरीने हिसकावून घेऊन बळजबरीने चोरून नेला. अज्ञात चोरट्यांविरोधात पिंपरी पोलिस

## आम आदमी पार्टीच्यावतीने भाजप विरोधात पिंपरीमध्ये जोरदार निदर्शने

# इडी, सीबीआयचा राजकीय वापर बंद करा !

## पिंपरी चिंचवड शहर आम आदमी पार्टी आक्रमक

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहर च्या वतीने डीलक्स चौक, पिंपरी येथे भाजप सरकारच्या अघोषित आणीबाणी विरोधात निदर्शने आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील सत्तेच्या सारीपाटावरती गेल्या दहा-बारा दिवसापासून ज्या घडामोडी घडत आहेत. त्यांचा मास्टरमाईंड भाजपाच आहे आणि सत्ता संघर्षाची ही राजकीय सर्कस इडी, सीबीआयसारख्या संविधानिक संघटनांचा दुरुपयोग करून घडवून आणल्या हे आपल्या सर्वांसमोर स्पष्ट झाले आहे. हे सर्व प्रस्थापित पक्ष चोर चोर मोसेरे भाई या उक्तीप्रमाणे भ्रष्टाचारात बरबटलेले आहेतच त्यात सूडबुद्धीने कारवाया करून किंवा पैशाने खरेदी करून सत्तेची गणिते जुळवण्याचे गलिच्छ राजकारण भाजपा संपूर्ण देशामध्ये करत आहे. ईडीच्या कारवाया फक्त विरोधकांना नामोहरम करण्यात आणि भाजपात सामील अथवा समर्थन मिळाले की क्लीन चिट देण्यासाठीच वापरत आहे.ही स्थिती भारतीय लोकशाही साठी घातक आहे. आज देशामध्ये भाजपच्या या गलिच्छ राजकारणाविरोधात फक्त आम आदमी पार्टीच सक्षमपणे लढा देत आहे. आपच्या मुख्यमंत्री, मंत्री आणि आमदारांना दिल्लीमध्ये भाजपने केंद्रीय यंत्रणेच्या माध्यमातून त्रास दिला परंतु आम आदमी पार्टी या सर्व पुरून उरली आहे.




### आंदोलनास यांची प्रामुख्याने उपस्थिती...

भारतीय लोकशाही वाचवण्यासाठी आता सामान्य जनतेलाच या लढ्यात उतरावे लागणार असल्याचे प्रतिपादन आपचे कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे यांनी केले स्वप्निल जेवले व यल्लाप्पा वालदोर यांनी या आंदोलनाचे संयोजन केले या आंदोलनाला आम आदमी पार्टीचे पिंपरी चिंचवड कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे, प्रचार प्रमुख राज चाकणे, पिंपरी विधानसभा कार्याध्यक्ष ब्रह्मानंद जाधव, चिंचवड विधानसभा कार्याध्यक्ष यशवंत कांबळे, भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष मंगेश आंबेकर, शहर संपर्कप्रमुख गोविंद माळी, शहर आयटी प्रमुख आशुतोष शेळके, असंघटित कामगार प्रमुख शुभम यादव, शहर वाहतूक प्रमुख सुखदेव कारले, शहर सामाजिक न्याय आघाडी प्रमुख चंद्रमणी जावळे, चिंचवड विधानसभा संपर्कप्रमुख संजय मोरे, शशिकांत कांबळे, नितीन कापसे, नंदू नारंग, अजय सिंग, महेश गायकवाड, मीनाताई जावळे, सरफराज मुल्ला, विजय कांबळे, गणेश करडे, सोमनाथ बनसोडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

> महाराष्ट्रातील सत्तेच्या सारीपाटावरती गेल्या दहा-बारा दिवसापासून ज्या घडामोडी घडत आहेत. त्यांचा मास्टरमाईंड भाजपाच आहे आणि सत्ता संघर्षाची ही राजकीय सर्कस इडी, सीबीआयसारख्या संविधानिक संघटनांचा दुरुपयोग करून घडवून आणल्या हे आपल्या सर्वांसमोर स्पष्ट झाले आहे.

# श्रीमंत दगडूशेठ गणपती हलवाई ट्रस्ट तर्फे वृक्षमित्र अरुण पवार व आशाताई पवार यांना 'वारकरी सेवा पुरस्कार'

## संतांच्या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर मोफत दिल्याबद्दल घेतली दखल

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

संतांच्या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर मोफत दिल्याबद्दल मराठवाडा जनविकास संघांचे अध्यक्ष वृक्षमित्र अरुण पवार व आशाताई पवार यांना श्रीमंत दगडूशेठ गणपती हलवाई ट्रस्ट तर्फे "वारकरी सेवा पुरस्कार" देवून सन्मानित करण्यात आले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त श्रीमंत दगडूशेठ गणपती हलवाई मंदिरात पालखीच्या मानाच्या अश्वाचे पूजन करतेवेळी हा सन्मान करण्यात आला. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष ह.भ.प.



गहिनीनाथ महाराज औसेकर, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती सार्वजनिक ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, ह.भ.प. मारुती कोकाटे, राजाभाऊ थोरात, धनंजय बडदे, बाळासाहेब वांजळे आदी मान्यवरांच्या हस्ते वृक्षमित्र अरुण पवार व आशाताई पवार यांना वारकरी सेवा पुरस्कार" देवून सन्मानित करण्यात आले.

अरुण पवार यांच्यामार्फत आळंदी घाट परिसर, मोरया गोसावी मंदिर परिसर व घाट, श्री क्षेत्र साई देवस्थान शिरगाव, श्री क्षेत्र देहू गाव व इंद्रायणी घाट परिसर, पिंपळे गुरव, सिंहगड किल्ला आदी ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. झोपडपट्टी परिसरातील भटक्या / निराधार / शिक्षणापासून वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वस्तीशाळा उपक्रम, एवढ्यावरच न थांबता कित्येक वर्षांपासून ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकर्यांना टँकरद्वारे मोफत पाणी वाटप, पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना 5000 पाणी बाटल्यांचे वाटप, जेष्ठ नागरीकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, झाडांसाठी मागेल त्याला मोफत पाणीपुरवठा करण्यात येतो.

वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून त्याच खर्चातून मोफत वृक्षांची रोपे वाटप, दुष्काळग्रस्त गावांसाठी टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा, पशुधन व वन्यजीव वाचवा मोहिम, एक मुठ धान्य वन्यप्राण्यांसाठी, जनजागृती अभियान, पिंपळे गुरव परिसरातील महिलांना मोफत डस्टबीन वाटप, शालेय विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप, पर्यावरणपूरक मोफत कापडी पिशव्या वाटप, लोकांना पाणी पिण्यासाठी विविध ठिकाणी पाणपोईंची स्थापना, अनाथ, निराधार लोकांना कपडे-स्वेटर – ब्लँकेट, फळे वाटप, कष्टकरी, गोरगरीब झाडूकाम करणाऱ्या कामगारांना दिवाळी फराळ व भेटवस्तू वाटप, पोस्ट कर्मचाऱ्यांना गणवेश व भेटवस्तूंचे वाटप करण्यात येते.

### सामाजिक कार्याची दखल घेत विविध संस्थांच्यावतीने सन्मानित

ज्येष्ठ नागरिकांना मोफत पंढरपूर व तुळजापूर दर्शन यात्रा, मोफत साहसी बालसंस्कार शिबीरांचे आयोजन, अंध – अपंगाना आर्थिक मदत व त्यांच्या संस्थाना वस्तूरूपी मदत, पोलिस ठाण्यांना बॅरीगेट व चहामशीन वाटप, माळीण दुर्घटनाग्रस्त कुटूंबांना आर्थिक मदत, १० वी १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार, युध्दात मृत्यूमुखी पडलेल्या जवानांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत, मोफत शिलाई मशीन वाटप , असे एक ना अनेक समाजपयोगी उपक्रम अरूण पवार निःस्वार्थीपणे व अविरत राबवत आहेत. या सर्व सामाजिक कार्याची दखल घेत विविध संस्थांच्यावतीने वृक्षमित्र अरुण पवार यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## संपादकीय »

# आव्हानांना भिडण्याची वेळ

***मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार अस्तित्वात आले असले आणि दोघांनीही तातडीने कामाला आरंभ केला असला तरी पुढचे काही महिने कमालीचे धावपळीचे आणि नवनव्या आव्हानांचे असणार आहेत.***

नवे मंत्रिमंडळ बनविण्यापासूनच आव्हाने सुरू होतील. 'आम्हाला मंत्री करा' असे पाठीराखे आमदार उघडच म्हणू लागले आहेत. सगळ्यांना मंत्री करणे शक्य नाही. दुसरीकडे, कमी आमदारांचे मुख्यमंत्री आणि जास्त आमदारांचे उपमुख्यमंत्री, हा सत्तेचा विषमतोल हे दोन्ही नेते जितके परस्पर समजुतीने वागतील, तितका कमी त्रासदायक ठरेल. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळातला बहुतेक वेळ हा करोनाची लढण्यात गेला आहे. राज्यापुढचे अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. 'मेट्रो', ओबीसी आरक्षण असे अनेक प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचे बनले आहेत. एकनाथ शिंदे यांच्या समवेत आलेल्या बहुतेक आमदारांची योजनांना पैसे मिळाले नसल्याची किंवा आपल्या मतदार संघांकडे दुर्लक्ष झाल्याची तक्रार असल्याचे म्हटले जाते. ही तक्रार सरकारचे नेतृत्व करणारे दोन्ही नेते किती वेगाने दूर करतात, यावर या सरकारची विश्वासार्हता ठरणार आहे. आज जे शिंदे यांच्यासमवेत आले आहेत, त्यातील अनेक वेळोवेळी विविध पक्षांमध्ये फिरून आले आहेत. पक्षनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा किंवा महाराष्ट्राचे हित या अनेकदा नुसत्या गप्पा मारायच्या गोष्टी असतात. तेव्हा अशा आमदारांच्या उचित आणि अनुचित अपेक्षा कशा पुऱ्या होणार, हे पाहावे लागेल. कोणतेही सरकार पडते आणि छोटे गट जन्माला येतात, तेव्हा केवळ फूट पडल्याचे बक्षीस म्हणून खिरापतीचे उदार वाटप करावे लागते. शरद पवार यांनी महाराष्ट्रातील वसंतदादा पाटील आणि नाशिकराव तिरपुडे यांचे दोन काँग्रेस पक्षांचे संयुक्त सरकार सन १९७८ मध्ये पाडले; तेव्हा कमी आमदार असूनही मुख्यमंत्रिपद तर मिळवलेच पण त्यांच्या तुलनेने अनुनभवी सहकाऱ्यांना मंत्रिपदे मिळाली. तसेच, आता होऊ शकते. यातून सरकारच्या कारभारावर विपरीत परिणाम होऊ शकतो. उद्धव ठाकरे यांच्या सरकारवर भाजपनेते जी टीका करीत होते, त्यातली प्रमुख टीका प्रचंड बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची होती. आता त्याच मंत्रिमंडळातील अनेक सहकारी सोबत असतील. हेच देवेंद्र फडणवीस यांच्याही मंत्रिमंडळात होते. मग ठाकरे मंत्रिमंडळात नेमका भ्रष्टाचार कसा होत होता आणि आता तो कसा रोखला जाणार आहे? याबाबत, नव्या सरकारला केवळ तोंडची वाफ दवडून चालणार नाही



## आनंदी सकाळ

# अध्यात्म कधी उपेक्षित नसते

गेल्या दशकापासून समाजाला अध्यात्म महत्त्वाचे वाटू लागले आहे. माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी 'माणूस' म्हणून आपले अस्तित्व अनुभवण्यासाठी अध्यात्म, नैतिकता यांची हाकाटी सुरू झाली. खरे पाहता अध्यात्म कधी उपेक्षित नसते. कधी महत्वाचे नसते. ते सर्व ठिकाणी, सर्व काळात सारख्याच महत्त्वाचे असते. ते मानव जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. अंत:करणाचा निरपेक्ष, अहंकाररहित विस्तार, समत्वबुद्धी, ईश्वराविषयीचा दृढ विश्वास, कर्मावरील अढळ श्रद्धा, स्वार्थहीन संवेदनशीलता, क्षमाभाव, मोठेपणा किंवा उदारता, पावित्र्य इत्यादींनी मिळून जी अध्यात्मवृत्ती मनाचा स्वभाव बनते, ती मुळली मानवतेने ओतप्रोत असते. म्हणून जी अध्यात्मवृत्ती मनाचा स्वभाव बनते, ती मुळी मानवतेने ओतप्रोत असते. म्हणून अशा व्यक्तींची कर्तव्यकर्मेसुद्धा लोकसंग्रहाचा भाग होतात. 'विचारुनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले । बरें शोधल्याविण बोलो नको हो । जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो ।

# पाऊले चालती पंढरीची वाट...



## भूमिका

गौरव जाधव
91 88051 21395

वारी हे मराठी सांस्कृतिक परंपरेचे वैभव आहे. असा अनुपम सोहळा जगाच्या पाठीवर कुठेही दिसत नाही. 'वारी' हा भक्तीचा सोहळा आहे. आनंदाचा मेळा आहे. यात दोन प्रकारची वाटचाल आहे - एक पंढरपूरच्या दिशेने मुक्काम दरमुक्काम करीत चाललेली पावलांची वाटचाल, तर दुसरी वाटचाल अंतरंगीची आहे. अहंकार आणि लोभ, मोह, क्रोध यांच्या पाशाचे एकेक पदर वा बंध उलगडीत पुढे जाणे आणि तितक्या प्रमाणात अहंकारमुक्त वा लोभमुक्त होत जाणे ही आत चाललेली दुसरी वाटचाल. एकीकडे भक्तीचा रंग, तर दुसरीकडे आतल्या रिपूंच्या विळख्यातून मुक्त होण्याचा मुक्तीचा रंग ही बाहेरची आणि आतली वारी आपल्याला दर पावलागणिक श्रीमंत करीत राहते. आपण बदलत राहतो. कळत वा नकळत. पंढरपूरची वारी हाच नेम आणि पंढरपूर हेच तीर्थधाम आहे; मी ऑफीस ला कॉल लावला... जस जशा फोन च्या रिंग वाजत होत्या तसं तशे माझे हृदयाचे ठोके वाढत होते... आता काय होतय.... काय म्हणतील ऑफिस वाले.... सुट्टी देतील कि नाही... अशा अनेक प्रश्नाची गर्दी माझ्या डोक्यात झाली होती... रेड सिग्नल लागला होता... ट्रॅफिक जाम झालं होतं.... आता फक्त कधी एकदा हिरवा सिग्नल लागतोय आणि कधी एकदा हे ट्राफिक मोकळं होतंय याची मी वाट पाहत होतो....फोन उचलला गेला आणि जे हवं तेच घडलं... मला सुट्टी मिळाली... मग् काय आनंद गगनात मावेना...आणि मग आमची वाटचाल सासवडच्या दिशेने सुरु झाली... जसजसं सासवड जवळ येऊ लागलं तसतसं गर्दी वाढू लागली... सासवडच्या एक किलोमीटर लांबच गाडी आम्हाला उभी करावी लागली... आणि आम्ही तिथून पायी जाण्याचे ठरवलं... त्या आधी आम्ही चहा पिण्यासाठी एका हॉटेलवर थांबलो... तिथं एक कुटुंब पण नाश्ता करत होतं... त्यांच्या कडून आम्हाला असे ऐकायला मिळाले कि दर्शन मिळणे शक्य नाही कारण खूप मोठी रांग आहे. हे ऐकून आता काय करायचं हा प्रश्न पडला... पण खूप वर्षातून हा योग आला आहे आता मोकळ्या हाताने माघारी जाणं शक्य न्हवते... आम्ही आमची पुढची वाटचाल सुरु केली हळूहळू आमच्या समोर एक अथांग जनसागर दिसू लागला आम्हाला. भक्तांचा एक महापूर लोटून आला होता सासवडला. सासवड हे सासवड नं वाटता ते पंढरपूरच आहे असा भास होऊ लागला... प्रचंड गर्दी... चालायला सुद्धा जागा नाही... त्या महापुराला टक्कर देत आम्ही पुढे सरकू लागलो होतो... माझी एक वर्षाची मुलगी माझी चिमुकली तिला हे सगळं नवीन होतं... पण तिला खूप आनंद वाटत होता ते सगळं बघून... ती पण खूप खुश होती... मागच्या वारीला तिचा जन्म झाला आणि आता ती वर्षाची झाली आणि वारीला पण आली... योगायोगच म्हणावं लागेल...आम्ही दर्शन रांगे पाशी येऊन उभे राहिलो... पहिल्या प्रथम तर ती रांग कुठून सुरु होतेय हेच कळले नाही... आम्ही शोध घेण्यास सुरवात केली... आणि पाहतो तो काय ती रांग नजर जाईल तिथपर्यंत होती... कुठे संपतेय का हिचा कुठे शेवट आहे का तरी हेच कळत न्हवते... एवढी मोठी रांग... आता काय करायचं... त्या रांगेचा शेवटचं सापडत न्हवता... तब्बल अर्धा तास फ़िरत राहिल्यानंतर आम्ही आता रांगेमध्ये शिरण्याचा निर्णय घेतला... परंतु पोलीस बंदोबस्त तेवढाच... कुणालाच मध्ये शिरून देत न्हवते... आम्ही संधीची वाट पाहू लागलो...

**(उर्वरित पुढील भागात)**

# पुरुषांची बाजूही समजून घेतली गेली पाहिजे...

**वयाच्या तिशीत सर्व प्रकारच्या सुखसोयींनी परिपूर्ण आयुष्य, गेलाबाजार एखादे भुक्कड ग्रीन कार्ड आणि सिक्स पॅक्स बॉडी असेल तरच त्याला सामान्यत: लग्नयोग्य पुरुष मानले जाते**

खरे तर तिचा केवळ उच्चार करणेही पुरुषप्रधान समजले जाते. कारण हल्ली सगळ्या पुरुषांना विशेषत: तरुणांना सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून ऊठसूट धोपटण्याची पद्धत आहे. उदा. सद्य:काळात पुरुषावर सतत 'परफॉर्मन्स'चे दडपण असते. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर स्वत:ला सिद्ध करत जगावे लागते. बरे, या भावना कोणापाशी व्यक्त करायची चोरी. कारण मग इतरांकडून कमकुवत समजले जाते. सगळ्यांना फक्त तथाकथित यशस्वी सर्वगुणसंपन्न पुरुष हवे असतात. वयाच्या तिशीत सर्व प्रकारच्या सुखसोयींनी परिपूर्ण आयुष्य, गेलाबाजार एखादे भुक्कड ग्रीन कार्ड आणि सिक्स पॅक्स बॉडी असेल तरच त्याला सामान्यत: लग्नयोग्य पुरुष मानले जाते. याची लिटमस चाचणी कोणत्याही भुक्कड विवाह मंडळाच्या अथवा सुमार भारतीय डेटिंग साइटवर सहज उपलब्ध होईल. त्या ठिकाणी नमूद सर्व अपेक्षा



तुलनात्मकदृष्टय़ा अभ्यासाव्यात. जणू पुरुषाच्या आयुष्यात संघर्ष असा काही असतच नाही आणि त्याने आपले साधे पुरुषत्व मिरवले की ते विखारीच असते असा गोड गैरसमज सर्वत्र आहे.

एखादा पुरुष काही स्वतंत्र विचाराने धडपड करू पाहत असेल किंवा जरा जास्त वयाचा झाला तर त्याला ज्या गलिच्छ शेरेबाजीला सामोरे जावे लागते त्याचा ताळेबंद कोणी मांडणार का? मुळात प्रश्न हा आहे की, कोणालाही आपल्या आयुष्यातील खासगी घटना समाजमाध्यमांवर मिरवायची हौस का असावी?

आलिया भट्ट किंवा अन्य कोणी अभिनेत्रीने समाजमाध्यमांवर काय पोस्ट करावे हे कुणीही त्यांना सांगू शकत नाही. सर्व व्यक्तींना संविधानाने व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. पण समाजातील काही लोक हे नेहमीच अशा प्रकारच्या स्वातंत्र्याला नाकारत आले आहेत. आपले ते प्रेम आणि दुसऱ्याचे ते प्रकरण ही भावना आजकालच्या तरुण मंडळींमध्ये प्रकर्षांने जाणवते. सानिया मिर्झा, आलिया भट्ट किंवा अन्य अभिनेत्रीने अशा प्रकारचे वागणे बिलकूल सहन करू नये. लोक ट्रोल करत असतील अशी तर त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देणे हेसुद्धा एक धाडस आहे आणि ते आलियाने दाखवले.

## ।। अभंगवाणी ।।



पावलें पावलें तुझें आम्हां सर्व ।
दुजा नको भाव होऊं देऊं ॥१॥
जेथें तेथें तुझीं च पाउलें ।
त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरे कारशेडसाठी नव्याने वृक्ष कत्तलींची गरज नाही

## शिंदे गट आणि भाजपचं सरकार येताच आरेतील मेट्रोच्या कारशेडला ग्रीन सिग्नल

।मुंबई ।महाईन्यूज।



शिंदे गट आणि भाजपचं सरकार येताच आरेतील मेट्रोच्या कारशेडला ग्रीन सिग्नल देण्यात आला. सत्तेच्या पहिल्याच दिवशी मेट्रो कारशेडविषयी मोठा निर्णय घेण्यात आल्याने पर्यावरणवादी पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. दरम्यान, मेट्रोला विरोध करणे म्हणजे पर्यावरणाला विरोध करण्यासारखं आहे, असं राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEPUTY CM UDDHAV THACKERAY) म्हणाले. तसंच, मेट्रो कारशेडसाठी आरेमध्ये आतापर्यंत २५ टक्के काम पूर्ण झालं आहे. त्यामुळे कारशेड पूर्ण करण्याकरता आता अजून झाडे कापण्याची गरज नाही, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटलंय की, सर्व झाडे मिळून त्यांच्या संपूर्ण आयुष्यात जितकं कार्बन शोषून घेतील तेवढं कार्बन मेट्रो ८० दिवसांच्या फेऱ्यात शोषून घेईल. म्हणूनच, सर्वोच्च न्यायालयाने आरे कारशेडसाठी परवानगी दिली. कापलेली झाडे आता पुन्हा लावता येणार नाहीत, हे माहित असूनही पर्यावरणवादी आंदोलन करत आहेत. काही पर्यावणवाद्यांना अपूर्ण माहिती असेल. काहींचं आंदोलन छद्म पर्यावरणवादी बनून स्पॉन्सर्ड असण्याची शक्यता आहे. तथापि, सर्व पर्यावरणवाद्यांचा आदर राखून त्यांच्याशी चर्चा करू, असंही फडणवीस म्हणाले.

मेट्रो हा मुंबईचा अधिकार आहे. मेट्रो नसल्याने मुंबईत प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे हे पाप आम्ही होऊ देणार नाही. मेट्रोला विरोध म्हणजे पर्यावरणाला विरोध. कांजूरला मेट्रोचं कारशेड नेलं तर चार वर्षे बांधकामाला लागतील. १० ते १५ हजार कोटींचा खर्च होईल. नाकापेक्षा मोती जड होईल. त्यामुळे मुंबईकरांना लवकरात लवकर ही मेट्रो मिळण्याकरता पर्यावरणपूरक निर्णय आम्ही घेणार आहोत. पर्यावरणवादी पर्यावरणाचा मुद्दा घेऊन उच्च न्यायालयात गेल. तिथे हरले. सर्वोच्च न्यायालयात हरले.

नव्याने काही ठिकाणी वन जमिनी केली आहेत. त्याबाहेरच्या जागेवर आम्ही डिझायन करणार आहोत. पर्यावरणवाद्यांचा मी सन्मान करतो, आरेचे जे आंदोलन आहे ते ज्यांना अर्धवट आहे तेच आंदोलन करत आहेत. पर्यावरणाचा मुद्दे घेऊन न्यायालयात हरले, सर्वोच्च न्यायालयातही हरले. सर्वोच्च न्यायालयानेच तिथे कारशेड तयार करायला परवानगी दिली. तसेच, मुंबईकर जी दररोज अशुद्ध हवा ग्रहण करत आहेत, ती वाचवण्यासाठीच आम्ही मेट्रो आणत आहोत, असंही फडणवीस म्हणाले.

### आरेबाबत काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

आरेसंदर्भातील विरोध काही प्रमाणात खरा आहे तर, काही प्रमाणात स्पॉन्सर्ड आहे. पर्यावरणवाद्यांचा मी सन्मान करतो. आपलं म्हणणं मांडण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतरच तो प्रकल्प सुरू झाला. मेट्रो कारशेडसाठी झाडे कापलेली आहेत. आतापर्यंत २५ टक्के काम पूर्ण झालं आहे. त्यामुळे आता पुन्हा झाडे कापण्याची गरज नाही. पुढच्या वर्षभरात काम पूर्ण होऊन मेट्रो सुरू होऊ शकते, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

### निर्णय सरसकट रद्द करणार नाही

अवघ्या आठ दिवसांत महाविकास आघाडीच्या सरकारने तब्बल ३०० हून अधिक जीआर बनवले. हे सर्व निर्णय सरसकट रद्द करणार नसल्याची माहिती आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले की, मागच्या सरकारचे निर्णय सरसकट रद्द करणार नाहीत, जे चुकीचे निर्णय आहेत ते अभ्यासपूर्ण विचार करूनच रद्द करण्यात येतील.

### उद्या विश्वासमताचा प्रस्ताव

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात विश्वासमताचा प्रस्ताव बहुमताने पारित होईल, असा विश्वास आहे. ॲड. राहुल नार्वेकर यांच्या रुपाने कायदेतज्ज्ञ, विधितज्ज्ञ अतिशय युवा तरुण अध्यक्षरुपाने महाराष्ट्राला प्राप्त झाले. त्यांचेही मनापासून अभिनंदन.

## शॉर्ट न्यूज

### पंजाबमधील आठ किलो सोन्याच्या चोरीचा छडा लावण्यात कवठेमहाकाळ पोलिसांना यश




।सांगली ।महाईन्यूज।

पंजाबमध्ये सहा महिन्यापुर्वी अडीच किलो सोन्याच्या चोरीचा छडा लावण्यात कवठेमहांकाळ पोलीसांना यश आले असले तरी मुख्य सूत्रधार अद्याप फरार आहे. चोरलेल्या सोन्यापैकी ४० लाखाचे ८१५ ग्रॅम सोने मात्र पोलीसांनी हस्तगत केले आहे.

याबाबत माहिती अशी की, पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील जिंदायल येथील सागर ज्वेलर्समध्ये सुमारे अडीच किलो सोने लंपास झाले होते. या प्रकरणी १३ जानेवारी रोजी ज्वेलर्समध्ये काम करणारा अनिकेत कदम याच्याविरूध्द पंजाब पोलीसामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.घटनास्थळीच मृत्यू झाला, तर पती निखील टावरी व कनक टावरी गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी ट्रकचालकास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# राजकीय घडामोडींना वेग

## बहुमत चाचणीसंदर्भात भाजपा-शिंदे गटाची संयुक्त बैठक



।मुंबई ।महाईन्यूज।

विधानसभेत अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि शिंदे गटाचे उमेदवार राहुल नार्वेकर यांना १६४ मतं मिळाली असून त्यांनी विजयी जल्लोष केला आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपा आणि शिंदे गटाची ही पहिली परीक्षा होती, यात सत्ताधारी पक्ष उत्तीर्ण झाला आहे. उद्या भाजपा आणि शिंदे गटाला विधानसभेत बहुमत चाचणीला सामोरं जावं लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

भाजपा आणि शिंदे गटाची संयुक्त बैठक मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये पार पडणार आहे. याठिकाणी उद्या बहुमत चाचणीला सामोरं जाताना काय रणनीती असायला हवी, याबाबत चर्चा केली जाणार आहे. या बैठकीला भाजपाचे आणि शिंदे गटाचे सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत. यादरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा नेते चंद्रकांत पाटील आणि शिवसेना नेते दीपक केसरकर आमदारांना मार्गदर्शन करण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, विरोधी पक्षनेता कोण असावा, याबाबत चर्चा करण्यासाठी वाय. बी चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक सुरू आहे.

# सर्वात तरुण विधानसभा अध्यक्ष म्हणून चर्चेत असलेले राहुल नार्वेकर

## राहुल नार्वेकर यांच्या राजकीय जीवनाचा हा आढावा

।मुंबई ।महाईन्यूज।

महाराष्ट्राच्या विधानसभा अध्यक्षपदावर भाजपाचे आमदार राहुल नार्वेकर यांची निवड झाली. महाविकासआघाडीकडून उभे असलेले शिवसेना उमेदवार राजन साळवी यांना पराभूत करून राहुल नार्वेकरांनी विजय मिळवला. या निवडणुकीत राहुल नार्वेकर यांना १६४ मतं, तर राजन साळवी यांना १०७ मतं मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल नार्वेकर हे आतापर्यंतचे सर्वात तरुण विधानसभा अध्यक्ष असल्याचं म्हटलं. याच राहुल नार्वेकर यांच्या राजकीय जीवनाचा हा आढावा.



व्यवसायाने वकील असणाऱ्या राहुल नार्वेकर यांनी सुरुवातीला शिवसेनेत काम केलं. आदित्य ठाकरे आणि त्यांचे निकटचे संबंध होते. यानंतर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून मावळ मतदारसंघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने राहुल नार्वेकर यांना विधान परिषदेवर पाठवलं. सप्टेंबर २०१९ मध्ये राहुल नार्वेकर यांनी भाजपात प्रवेश केला. ते भाजपाचे माध्यम प्रभारीही (मीडिया इनचार्ज) राहिले आहेत. ते ऑक्टोबर २०१९ मध्ये ते कुलाबा विधानसभा मतदारसंघातून भाजपाच्या तिकिटावर निवडून गेले. कुलाबा मतदारसंघात एकूण २ लाख ६६ हजार ५८७ मतं आहेत.

यापैकी १ लाख ६ हजार ६३० मतदारांना आपला मताचा हक्का बजावला. भाजपाचे उमेदवार राहुल नार्वेकरांना या निवडणुकीत ५७ हजार ४२० मतं मिळाली, काँग्रेसचे अशोक जगताप यांना ४१ हजार २२५ मतं मिळाली. राष्ट्रवादीच्या जितेंद्र कांबळे यांना केवळ ३ हजार ११ मतं मिळाली होती. "मला एका गोष्टीचं खूप कौतुक आहे. राहुल नार्वेकर कुठल्याही पक्षात गेले तर त्या पक्षाच्या नेतृत्वाच्या खूप जवळ जातात.

### अजित पवार राहुल नार्वेकरांविषयी म्हणाले...

अजित पवार म्हणाले, "राहुल नार्वेकर पूर्वी शिवसेनेत होते. त्यावेळी माझ्या कानावर आलं होतं की आदित्य ठाकरे यांचे जवळचे सहकारी म्हणून त्यांनी काम केलं. त्यांनी आदित्य ठाकरेंना कायद्याचं बरंच ज्ञान यांना देण्याचा प्रयत्न केला. आम्ही देखील अशा लोकांवर लक्ष ठेवून असतो. त्यामुळे मला मावळ लोकसभा मतदारसंघात अभ्यासू व सुशिक्षित उमेदवार पाहिजे होता."

## शॉर्ट न्यूज »

### मोदी यांची युक्रेनबाबत पुतिन यांच्याशी चर्चा

नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. रशियाने संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे युक्रेनशी सुरू असलेल्या वादावर तोडगा काढावा, या भारताच्या भूमिकेचा मोदींनी या वेळी पुनरुच्चार केला. दोन्ही नेत्यांनी आंतरराष्ट्रीय ऊर्जा आणि अन्नधान्य बाजारपेठेच्या सद्यःस्थितीसह जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाने निवेदनाद्वारे दिली आहे.

दोन्ही नेत्यांनी डिसेंबर २०२१ मध्ये पुतिन यांच्या भारतभेटीदरम्यान घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. द्विपक्षीय व्यापाराला विशेषत: कृषी क्षेत्रातील उत्पादने, खते आणि औषध उत्पादन क्षेत्रात अधिक प्रोत्साहन कसे देता येईल, यावर विचारविनिमय केला. या वेळी दोन्ही नेत्यांनी जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर नियमित संवाद सुरू ठेवण्यास सहमती दर्शवली. पुतिन यांच्याशी चर्चेच्या काही दिवस आधी, मोदींनी 'जी-७' सदस्य राष्ट्रांच्या शिखर परिषदेत युक्रेन संघर्षसंदर्भात भारत नेहमीच शांतता राखण्याचे समर्थन करेल, असे ठामपणे सांगितले होते. ते म्हणाले होते, की आम्ही सतत संवाद व मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारण्याचा आग्रह धरला आहे.

# "कुठं बाकडं वाजवताय? तुमचं मंत्रीपदच येईल की नाही सांगता येत नाही"!

## अजित पवारांचा चंद्रकांत पाटलांना टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यात भाजपाने शिवसेनेतील बंडखोर आमदारांसह सत्तास्थापन केली. यानंतर अनपेक्षितपणे मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे यांना देण्याची घोषणा झाली आणि देवेंद्र फडणवी यांना केंद्रीय नेतृत्वाच्या आग्रहाखातर उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावं लागलं. हाच धागा पकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अजित पवार यांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना चिमटा काढला. "चंद्रकांत पाटलांना मंत्रिपद मिळेल का नाही हेच अद्याप सांगता येत नाही. त्यामुळे त्यांनी बाकडं वाजवू नये," असं म्हणत अजित पवारांनी टोला लगावला. ते रविवारी (३ जुलै) विधानसभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या स्वागतपर भाषणात बोलत होते. अजित पवार म्हणाले, "कुणी काहीही म्हटलं तरी सगळ्यांच्या मनात धाकधूक धाकधूक आहे. भाजपाचे १०५ आमदारांनी आपल्या सदसदविवेक बुद्धीला स्मरून विचार की जे घडलंय त्याने आपलं समाधान झालं आहे का? चंद्रकांत पाटील यांनी यावर बाकडं वाजवू नये. तुमचं मंत्रीपदच येईल की नाही सांगता येत नाही. कुठं बाकडं वाजवताय? शिवसेनेतून तिकडे गेलेल्या ३९ लोकांपैकी किती लोकांना मंत्रिपद मिळणार आहे? सगळ्यांना वाटतंय मिळेल.

### "कितीतरी भाजपाचे नेते तर ढसाढसा रडायलाच लागले"

अजित पवार पुढे म्हणाले, "अनेक कट्टर काम करणारे मान्यवर थोडेसे नाराज आहेत. देवेंद्र फडणवीस टीव्हीवर बोलत होते आणि त्यांनी मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी एकनाथ शिंदे घेतील सांगितलं तेव्हा 'पिन ड्रॉप सायलन्स' झाला. कितीतरी भाजपाचे नेते तर ढसाढसा रडायलाच लागले. कुणाला काही कळेनाच. सगळ्या महाराष्ट्रासाठीच तो धक्का होता."

### "गिरीश महाजनांनी तर फेटा सोडून डोळ्याचं पाणी पुसलं"

"गिरीश महाजन यांचं तर अजूनही रडणं बंद होईना. त्यांना फेटा बांधायला दिला तर त्यांनी फेटा सोडून डोळ्याला आलेलं पाणी पुसण्यासाठी फेट्याचा वापर करत आहेत. त्यांना देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री न झाल्याचं फारच वाईट वाटलं," असं म्हणत अजित पवारांनी गिरीश महाजन यांनाही कोपरखळी लगावली.

### "मला मूळ भाजपाच्या मान्यवरांविषयी वाईट वाटतं"

भाजपाच्या नेत्यांवर बोलताना अजित पवार म्हणाले, "मी जेव्हा सभागृहात समोरच्या बाजूला पाहतो तेव्हा मूळचे भाजपाचे मान्यवर कमी आणि आमच्याकडून गेलेलेच जास्त मान्यवर पाहायला मिळतात. आमच्या मान्यवरांना पदावर बसलेलं पाहून मला मूळ भाजपाच्या मान्यवरांविषयी वाईट वाटतं. ते मूळ मान्यवरांना बाजूला सारून तिथं पदावर बसलेत. पहिली रांग पाहिली तरी ते लक्षात येईल."

# "२०२४ पर्यंत ईशान्य भारतातील सर्व प्रश्न सोडवणार"

## राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत शहांचे वक्तव्य

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२४ पर्यंत ईशान्य भारतातील सर्व प्रश्न सोडवणार असल्याचं वक्तव्य केलं आहे. ते हैदराबादमधील भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत राजकीय विषयांवर बोलत होते. याबाबत आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. अमित शाह यांनी ईशान्य भारतात आता आगामी काळात कोणतेही प्रश्न राहणार नाहीत, असंही सांगितल्याचं शर्मा यांनी नमूद केलं. ते रविवारी (३ जुलै) हैदराबादमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

हिमंता बिस्वा शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमित शाह म्हणाले, "२०१४ मध्ये केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर ईशान्य भारतात विकास कामांना गती मिळाली आहे. ईशान्य भारतातील ६० टक्के भागातून अफ्स्पा कायदा (AFSPA Act) हटवण्यात आला आहे. केंद्र सरकारने नागालँडमधील ७ जिल्ह्यांमधील १५ पोलीस स्टेशनच्या परिसरातून अफ्स्पा कायदा हटवला आहे. मणिपूरच्या ६ जिल्ह्यातील १५ पोलीस स्टेशनच्या भागातूनही अफ्स्पा हटवला आहे. याशिवाय आसाममधील २३ जिल्ह्यांमधून पूर्णपणे आणि एका जिल्ह्यातून काही प्रमाणात हा कायदा हटवला.

आगामी काळात या भागात कोणताही प्रश्न शिल्लक "मोदींविरोधात केलेले सर्व आरोप खोटे असल्याचं सिद्ध झालं" अमित शाह यांनी गुजरात दंगलीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय ऐतिहासिक असल्याचं मत व्यक्त केलं. नरेंद्र मोदी यांच्याविरोधात लावण्यात आलेले सर्व आरोप खोटे असल्याचं या निर्णयाने सिद्ध केलं. हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित होते, असाही आरोप अमित शाह यांनी केला.

### "गांधी कुटुंब भीतीमुळे अध्यक्षपदाची निवडणूक देखील घेत नाही"

अमित शाह म्हणाले, "विरोधी पक्ष विखुरलेला आहे. काँग्रेस पक्षात लोकशाही आणण्यासाठी त्या पक्षाचे सदस्यच लढाई लढत आहेत. गांधी कुटुंब भीतीमुळे अध्यक्षपदाची निवडणूक देखील घेत नाहीये. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकचा विरोध, कलम ३७० हटवण्याचा विरोध, जीएसटीचा (GST) विरोध, आयुष्मान भारत योजनेचा विरोध, लस व लसीकरणाचा विरोध, सीएएचा (CAA) विरोध, राम मंदिराला विरोध यातून काँग्रेस प्रत्येक विषयात केवळ विरोधत करत असल्याचं दिसतं." राहणार नाही."

# नुपूर शर्मा यांना सुप्रीम कोर्टाने फटकारल्यानंतर मोदी सरकारकडून पहिली प्रतिक्रिया

## मोहम्मद प्रेषितांविरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्य. सुप्रीम कोर्टाने भाजपाच्या निलंबित नेत्या नूपुर शर्मा यांना फटकारलं

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मोहम्मद प्रेषितांविरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सुप्रीम कोर्टाने भाजपाच्या निलंबित नेत्या नूपुर शर्मा यांना कठोर शब्दांमध्ये फटकारलं

मोहम्मद प्रेषितांविरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सुप्रीम कोर्टाने भाजपाच्या निलंबित नेत्या नूपुर शर्मा यांना कठोर शब्दांमध्ये फटकारलं आहे. नुपुर यांच्या बेलगाम वक्तव्यामुळेच संपूर्ण देशभर वणवा पेटवला अशा शब्दात सुप्रीम कोर्टाने त्यांना सुनावलं.



देशात ज्या घटना घडताहेत त्याला केवळ त्याच जबाबदार आहेत. त्यांनी त्याचवेळी त्वरित देशाची माफी मागायला हवी होती, आताही त्यांनी संपूर्ण देशाची मागावी असेही ताशेरे कोर्टाने ओढले. दरम्यान यावर कायदेमंत्री किरेन रिजिजू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

जरी मला निर्णय आवडला नाही किंवा ज्याप्रकारे निरीक्षणं नोंदवण्यात आली त्यावर आक्षेप असला तरी मला त्यावर भाष्य करायचं नाही," असं किरेन रिजिजू म्हणाले आहेत.

पुढे ते म्हणाले की, "अनेकजण यावर व्यक्त होत आहेत. मला अनेकांचे यावर व्यक्त होण्यासाठी संदेश येत आहेत. पण मी योग्य ठिकाणी यावर चर्चा करेन". कोर्टाने निरीक्षण नोंदवलं असून तो निर्णयाचा भाग नाही असंही ते म्हणाले. किरेन रिजिजू हैदराबादमध्ये पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत सहभागी होण्यासाठी पोहोचले होते. यावेळी त्यांना सुप्रीम कोर्टाने नुपूर शर्मा यांना फटकारल्यासंबंधी विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, "कायदामंत्री या नात्याने सुप्रीम कोर्टाचा निर्णय किंवा त्यांनी नोंदवेलल्या निरीक्षणावर मी भाष्य करणं योग्य ठरणार नाही".

प्रेषितांविरोधातील वादग्रस्त वक्तव्यानंतर शर्मा यांच्यावर अनेक राज्यांत ठिकठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ते एकत्र करण्याची शर्मा यांची याचिका न्यायालयाने फेटाळली. प्रेषितांविरोधातील टिप्पण्या एकतर थिल्लर प्रसिद्धीसाठी, राजकीय हेतूने किंवा दुष्कृत्यासाठी केल्या गेल्या असाव्यात, असं मतही न्यायालयाने व्यक्त केलं. गुन्हे एकत्र करण्याच्या शर्मा यांच्या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार देताना, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला यांच्या खंडपीठाने त्यांना याचिका मागे घेण्यास परवानगी दिली. शर्मा यांनी केलेली वक्तव्यं अस्वस्थ करणारी आणि अहंकारी आहेत. अशी विधाने करण्याची काय गरज होती? त्यांच्या वक्तव्यामुळे देशात दुर्दैवी घटना घडल्या. हे लोक धार्मिक नाहीत. त्यांना इतर धर्मांबद्दल आदर नाही. क्षुल्लक प्रसिद्धीसाठी, राजकीय हेतूने किंवा अन्य कोणत्या तरी दुष्कृत्यासाठी त्यांनी ही वक्तव्ये केली, असं निरीक्षण खंडपीठाने नोंदवलं.

# लोणावळ्यात पोहोचली 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ची टीम


सोनी मराठी टेलिव्हिजनवरील 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा लोकप्रिय कार्यक्रम मागील अनेक दिवसांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या कार्याक्रमातील प्रत्येक कलाकार उत्तम सादरीकरण करून प्रेक्षकांचे मनोरंजन करतो. सध्या या कार्यक्रमाचे संपूर्ण महाराष्ट्रात चाहते आहेत. नुकत्याच काही दिवसांपूर्वी या कार्यक्रमाने काही काळासाठी ब्रेक घेतला असून लवकरच नवे पर्व घेऊन ते प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार येत्या ५ जुलै रोजी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या पुढील पर्वाच्या चित्रीकरणाला सुरूवात होणार आहे. दरम्यान, या कार्यक्रमाचे शूटिंग पूर्ण होण्याआधी या कार्यक्रमातील कलाकार पिकनिकला गेल्याचे दिसत आहे. सध्या ही संपूर्ण टीम लोणावळ्याच्या एका रिसॉर्टमध्ये एन्जॉय करत आहे. या पिकनिक दरम्यानचा एक फोटो अभिनेता समीर चौगुले याने आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे.



## प्राजक्ता माळीच्या पावसाळी ट्रिप

अभिनेत्री प्राजक्ता माळी सोशल मीडियावर फारच सक्रिय असते. आपला दिनक्रम, चित्रपट, कुटुंबाबाबत ती सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. चाहत्यांनी संवाद साधण्याचा हा तिचा अनोखा फंडा आहे. प्राजक्ता मध्यंतरी हिमाचल ट्रिपला गेली होती. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमामधून मिळालेला निवांत वेळ तिने एण्जॉय केला. आता तिच्या पावसाळी ट्रिपची सोशल मीडियावर चर्चा रंगत आहे.प्राजक्ता एकटीच नव्हे तर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमाची संपूर्ण टीम पावसाळी ट्रिपसाठी लोणावळा इथे गेली होती. याचदरम्यानचे फोटो सोशल मीडियावर बरेच व्हायरल झाले. प्राजक्ताने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे स्वतःचे निसर्गाच्या सानिध्यामधील काही फोटो तसेच एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या संपूर्ण टीमने लोणावळ्यामध्ये पावसाळी ट्रिपचा आनंद लुटला. समीर चौघुले, नम्रता संभेराव या कलाकारांनी यादरम्यानचे फोटो देखील सोशल मीडियावर शेअर केले होते. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम गेल्या काही वर्षांपासू प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन करत आहे. लवकरच या कार्यक्रमाचं नवं पर्व सुरु होईल. म्हणजेच प्रेक्षकांना पुन्हा एकदा मनोरंजनाचा डबल डोस अनुभवायला मिळणार आहे.





## "लग्नापूर्वीच गरोदर असणं म्हणजे..."; अभिनेत्री दिया मिर्झाचं वक्तव्य चर्चेत



अभिनेत्री दिया मिर्झाचं खासगी आयुष्य नेहमीच चर्चेत राहिलं आहे. लग्नापूर्वीच दिया गरोदर राहिली. आपण गरोदर असल्याचं कळताच दियाने वैभव रेखी याच्याशी लग्नगाठ बांधली. फक्त दियाच नव्हे तर बॉलिवूडमधील काही अभिनेत्रींच्या बाबतीत देखील असंच घडताना दिसलं. पण लग्नापूर्वीच गरोदर असणं कितपत योग्य आहे? याबाबत दियाने स्पष्टपणे आपलं मत मांडलं आहे. अभिनेत्री आलिया भट्ट लग्नाच्या २ महिन्यानंतर गरोदर असल्याचं कळताच दिया याविषयावर बोलली. दियाने ई-टाइम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये लग्नापूर्वीच गरोदर असण्यावर आपलं मत मांडलं. याबाबत बोलताना ती म्हणाली. "आपल्या समाजामध्ये बरेच लोक असे आहेत की लग्नापूर्वी सेक्स आणि गरोदर असणं याकडे विचित्र नजरेने पाहतात. पण काही लोक असेही आहेत की ज्यांना या गोष्टी आपल्या आवडीनुसार करायला आवडतात. लग्नापूर्वीच सेक्स किंवा गरोदर असणं ही प्रत्येकाची निवड आहे.

## चित्रपटांचा बहुभाषिक प्रवास

हिंदी चित्रपटसृष्टीत चित्रपटांच्या प्रसिद्धीसाठी दररोज नव-नव्या तंत्राचा वापर केला जातो. एकदा का ते तंत्र यशस्वी ठरले की मग त्याचा प्रभाव सगळीकडे दिसून येतो, याची प्रचीती पुन्हा एकवार येते आहे. खरंतर, या वेळी काहीशी उलट परिस्थिती पाहायला मिळते आहे. म्हणजे प्रसिद्धीचे हे नवे तंत्र दाक्षिणात्य चित्रपटांनी त्यांच्या सोईसाठी सुरू केले होते. करण जोहर नामक भन्नाट व्यावसायिक डोके असलेल्या निर्मात्याने याचा फायदा घेत 'बाहुबली' दाक्षिणात्य भाषांबरोबरच हिंदीतही आणला. या चित्रपटाने देशभरात कमाईचा जो इतिहास घडवला ते लक्षात आल्यानंतर आता हिंदी असो, दाक्षिणात्य असो वा मराठी चित्रपट असोत.. प्रत्येकालाच आपला चित्रपट 'देशव्यापी' असावा, असे वाटू लागले आहे. त्यामुळे आता आपले चित्रपट हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू, कन्नड, इंग्रजी अशा विविध भाषेत डब करून देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याची अहमहमिकाच जणू निर्मात्यांमध्ये लागलेली दिसते. ओटीटीमुळे जागतिक स्तरावरील आशयापासून प्रादेशिक चित्रपट वा वेबमालिका पाहण्याची सवय प्रेक्षकांना लागली आहे, हे सगळय़ांना ज्ञात झाले आहे. चित्रपट विविध भाषेत डब करून दाखवण्याची ही प्रथा नव्यानेच सुरू झाली आहे का? तर तसे नाही. याआधीही चित्रपट विविध भाषेत डब केले जातच होते, मात्र मुख्य प्रवाहातील चित्रपट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंदी चित्रपटांनी याकडे फारसे लक्ष दिले नव्हते. हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याने देशभरात सगळीकडेच हिंदी चित्रपट पाहिले जातात.



## पोलिसी खाक्या..



दिग्दर्शक रोहित शेट्टी हा त्याच्या थरारक ॲक्शनपटांसाठी प्रसिद्ध आहेच, पण त्याने रुपेरी पडद्यावर 'सिंघम', 'सिम्बा' आणि 'सूर्यवंशी' अशा चित्रपटांच्या माध्यमातून पोलिसी कथांची रुपेरी पडद्यावर उभी केलेली चित्रपट मालिका जास्त कौतुकाचा विषय ठरली आहे. त्याच्या कल्पनेतून रुपेरी पडद्यावर साकारलेले पोलिसांचे विश्व (कॉप युनिव्हर्स) आता ओटीटी माध्यमांपर्यंत विस्तारले आहे. 'इंडियन पोलीस फोर्स' नावाने रोहित शेट्टीची निर्मिती असलेली वेबमालिका ॲमेझॉन प्राइमवर झळकणार आहे. सध्या या वेबमालिकेबद्दल लोकांमध्ये कमालीची उत्सुकता आहे, मात्र मालिकेच्या ओटीटी प्रदर्शनासाठी आणखी थोडी कळ सोसावी लागणार असल्याची माहिती रोहित शेट्टीने दिली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### अँडरसनच्या टोमणेबाजीला रविंद्र जडेजाचे सडेतोड उत्तर



नवी दिल्ली । महाईन्यूज

भारत आणि इंग्लंड यांच्यातील निर्णायक कसोटी सामना एजबस्टन येथे खेळवला जात आहे. आज या सामन्याचा तिसरा दिवस असून इंग्लंड पहिल्या डावात अद्याप पिछाडीवर आहे. या सामन्यात दोन्ही देशांच्या खेळाडूंदरम्यान किरकोळ शाब्दिक वाद होताना दिसत आहेत. सामन्याच्या पहिल्या डावात ऋषभ पंत आणि रविंद्र जडेजाच्या शानदार शतकांमुळे भारतीय डावाला आकार मिळाला. रविंद्र जडेजाच्या या कामगिरीमुळे जेम्स अँडरसनच्या मात्र, पोटात दुखायला लागले आहे. जडेजा स्वत:ला आता फलंदाज समजत असल्याचा खोचक टोमणा अँडरसन मारला आहे. त्याला जडजाने सडेतोड उत्तर दिले आहे.

एजबस्टन कसोटीत रविंद्र जडेजाने १०४ धावांची खेळी करत इंग्लंडमधील पहिले

# जॉनी बेअरस्टोचे धडाकेबाज शतक!

## इंग्लंडचा डाव सावरण्याचा केला प्रयत्न

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारत आणि इंग्लंड यांच्यातील निर्णायक कसोटी सामना एजबस्टन येथे खेळवला जात आहे. आज या सामन्याचा तिसरा दिवस असून इंग्लंड पहिल्या डावात अद्याप पिछाडीवर आहे. दरम्यान, सुरुवातीचे सर्व फलंदाज झटपट बाद झाल्यानंतर जॉनी बेअरस्टोने एकट्याने डाव सावरण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने एजबस्टन येथे धडाकेबाज शतक ठोकले आहे. त्याने ११९ चेंडूंचा सामना करत शतक पूर्ण केले. हे त्याचे कसोटी क्रिकेटमधील सलग तिसरे शतक ठरले आहे.



> इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जॉनी बेअरस्टो सध्या अतिशय चांगल्या फॉर्ममध्ये आहे. काही दिवसांपूर्वीच न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत त्याने अक्षरश: धुमाकूळ घातला होता. त्याने ट्रेंट ब्रिज आणि हेडिंग्ले येथे एकापाठोपाठ एक शतक झळकावले होते. भारताविरुद्धच्या पाचव्या कसोटी सामन्यातही त्याने आपला आक्रमक खेळ सुरू ठेवला आहे. इंग्लंडच्या इतर फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांसमोर माना टाकलेल्या असताना जॉनीने एक बाजू लावून धरली. भारताविरुद्ध शतक करून त्याने या वर्षातील आपले पाचवे कसोटी शतक साजरे केले.

इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जॉनी बेअरस्टो सध्या अतिशय चांगल्या फॉर्ममध्ये आहे. काही दिवसांपूर्वीच न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत त्याने अक्षरश: धुमाकूळ घातला होता. त्याने ट्रेंट ब्रिज आणि हेडिंग्ले येथे एकापाठोपाठ एक शतक झळकावले होते. भारताविरुद्धच्या पाचव्या कसोटी सामन्यातही त्याने आपला आक्रमक खेळ सुरू ठेवला आहे. इंग्लंडच्या इतर फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांसमोर माना टाकलेल्या असताना जॉनीने एक बाजू लावून धरली. भारताविरुद्ध शतक करून त्याने या वर्षातील आपले पाचवे कसोटी शतक साजरे केले. आजच्या शतकी खेळीमध्ये १४ चौकार आणि दोन षटकारांचा समावेश आहे. यासोबतच तो यावर्षात (२०२२) कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा फटकावणार फलंदाज ठरला आहे. हेडिंग्ले येथे झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात तर जॉनी बेअरस्टोने ४४ चेंडूत ७१ धावांची वादळी खेळी केली होती. त्याने अवघ्या ३० चेंडूत कसोटी अर्धशतक पूर्ण केले होते. इंग्लिश कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हे दुसरे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले होते.





# सचिन आणि युवराजने दिल्या लाडक्या भज्जीला शुभेच्छा

## हरभजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारतीय क्रिकेट संघातील अनेक आजी-माजी खेळाडू एकमेकांचे अतिशय चांगले मित्र आहेत. अशाच खेळाडूंमध्ये युवराजर सिंग, सचिन तेंडुलकर आणि हरभजन सिंग या त्रिकूटचा समावेश होतो. यापैकी, हरभजन सिंग अर्थात 'भज्जी'चा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्त अनेकांनी त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. त्याचे जवळचे मित्र असलेल्या सचिन आणि युवराजने खास पद्धतीने भज्जीला शुभेच्छा दिल्या आहेत. दोघांनीही आपापल्या सोशल मीडियावर भज्जीचे व्हिडीओ शेअर केले आहेत.

हरभजनच्या वाढदिवसानिमित्त युवराज सिंगने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्याने भज्जीसोबत घालवलेले खास क्षण दाखवले आहेत. युवराजचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओच्या कमेंटबॉक्समध्ये अनेक चाहत्यांनी हरभजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. युवराजप्रमाणे मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनेदेखील आपल्या ट्वीटर अकाऊंटवर हरभजनचा एक जुना व्हिडीओ पोस्ट केला आहे. हा व्हिडीओ २००१मधील भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यातील आहे.

कोलकात्यामध्ये झालेल्या या सामन्यात भज्जीने भारतासाठी पहिल्यांदा कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेतली होती. त्या क्षणाचा व्हिडीओ शेअर करून सचिनने हरभजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. ३ जुलै १९८० रोजी पंजाबमधील जालंधर येथे जन्मलेल्या हरभजन सिंगने आपल्या क्रिकेट कारकीर्दीमध्ये अनेक विक्रम केले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही